**केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ४ (१) अन्वये प्रसिध्द करावयाची माहिती.**

| कलम ४(१) | तरतूदी | माहितीचे विवरण |
|---|---|---|
| एक | रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील | महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना दि. २८ एप्रिल, १९७६ रोजी कंपनी कायदा, १९५६ च्या अंतर्गत झालेली आहे. महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल हे रू. १० कोटीचे असून त्यापैकी रू. ५ कोटी चे भाग भांडवल विक्रीस काढलेले असून रू. ४.१८ कोटीचे समभागाची विक्री झालेली आहे. भागभांडवलाची विभागणी ही चार प्रकारे करण्यात आलेली असून महाराष्ट्र शासनाचे ४९ टक्के भागभांडवल, राष्ट्रीय बियाणे महामंडळ नवी दिल्लीचे ३५.४४ टक्के भागभांडवल, कृषि विद्यापीठाचे २.८६ टक्के व कृषक भागधारकांचे १२.७० टक्के भागभांडवल अशी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापनेमागील मूळ उद्देश राज्यातील शेतक—यांना दर्जेदार प्रमाणित बियाण्याचा रास्त दराने पुरवठा करणे हा आहे. महामंडळाचे कार्य संचालक मंडळाव्दारे चालविले जाते. सर्व प्रकारचे धोरणात्मक निर्णय संचालक मंडळाव्दारे घेतल्या जातात. महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाचे प्रधान सचिव हे या महामंडळाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. महामंडळाच्या संचालक मंडळावर एकूण १५ संचालकाची नेमणूक करण्यात येत असून त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचे ७, राष्ट्रीय बियाणे महामंडळाचे ५ कृषि विद्यापीठाचा १ व कृषक भागधारकांनी निवडून दिलेले २ असे एकूण १५ सदस्य संचालक मंडळावर कार्यरत असतात. सद्यस्थितीत महाराष्ट्र शासनाचे ३, राष्ट्रीय बियाणे महामंडळाचे ४ व भागधारकांनी निवडून दिलेले २ असे ९ सदस्य संचालक मंडळावर कार्यरत आहेत.<br>महामंडळाचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता भा.प्र. से. दर्जाचे अधिकारी यांची व्यवस्थापक संचालक म्हणून शासन नियुक्ती करते. तसेच प्रत्येक विभागात महाव्यवस्थापक दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत. |
| दोन | अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये | महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता संचालक मंडळाने **कर्तव्ये व जबाबदा—या ठरविलेल्या असून त्याबाबत सविस्तर माहिती महामंडळाचे संकेत स्थळ www.mahabeej.com वर उपलब्ध आहे.** |
| तीन | निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली | धोरणात्मक निर्णय हे संचालक मंडळाव्दारे किंवा संचालक मंडळाने गठीत केलेल्या उपसमितीव्दारे घेतल्या जातात. व घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम व्यवस्थापकीय संचालकांचे असते. त्यांना सहाय्य करण्याकररिता महाव्यवस्थापक दर्जाचे अधिकारी असून त्यांच्या विभागामार्फत पार पाडल्या जाणा—या कामगिरीसाठी ते जबाबदार असतात.या करिता संचालक मंडळाने सूत्रबध्द प्रशासकीय आराखडा तयार केलेला असून प्रत्येक पदाचे उत्तरदायित्व ठरविण्यात आलेले आहे. **महामंडळाचा प्रशासकीय आराखडा महामंडळाचे संकेत स्थळ www.mahabeej.com वर उपलब्ध आहे.** |

| कलम ४(१) | तरतूदी | माहितीचे विवरण |
|---|---|---|
| चार | प्राधिकारणाची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडुन ठरविण्यात आलेली मानके | महामंडळाचे कार्य सुचारू पध्दतीने पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी तथा कर्मचा—यांकरिता कर्तव्ये तथा जबाबदा—या निश्चित करण्यात आलेल्या असून त्यांना आपआपल्या क्षेत्राचे लक्षांक देण्यात येते व त्याची मानकाप्रमाणे पूर्ती झाली किंवा नाही ही बाब कर्मचारी तथा अधिकारी यांनी त्यांचे स्वयंमुल्यांकन अहवाल व त्यांचे संबंधीत वर्षाचे गोपनीय अभिलेखामध्ये करण्यात येते. |
| पाच | कार्ये पार पाडण्यासाठी प्राधिकरणाच्या कर्मचारी वर्गाकडुन वापरण्यात येणारे नियम,विनियम,सूचना, नियम पुस्तिका आणि अभिलेख | महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचे संचालक मंडळाने कार्ये पार पाडण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांचे करिता सेवानियम तयार केलेले असून आवश्यक्तेनुसार त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात येत असते. **सेवानियम महामंडळाचे संकेत स्थळ www.mahabeej.com वर उपलब्ध आहे**. त्याचप्रमाणे महामंडळाचे संस्थापन समयलेख तसेच संस्थापन नियमावलीसुध्दा आहेत. |
| सहा | प्राधिकरणाकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांचे विवरण | महामंडळामध्ये कार्यरत विविध विभाग तसेच त्यांचे नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या कार्यालयांमधील **दस्ताऐवजाचे विवरण महामंडळाचे संकेत स्थळ www.mahabeej.com वर उपलब्ध आहे**. |
| सात | आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनीमय करण्यासाठी किंवा लोकांकडुन निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील. | महामंडळाचे धोरण ठरवितांना त्या अनुषंगाने सर्वसाधारण सभेमध्ये भागधारक शेतकरी यांनी दिलेली निवेदने , डिलर्स/ विक्रते विक्रेत्यांकडून वार्षिक संमेलनामध्ये प्राप्त झालेली निवेदने तसेच महामंडळाचे कर्मचारी/अधिकारी यांचे संघटनेकडून प्राप्त झालेली निवेदने किंवा अभिवेदने तसेच भागधारक शेतक—यांकडून निवडून दिलेले प्रतिनिधी संचालकांकडून प्राप्त झालेल्या सूचना/निवेदनावर साधक बाधक चर्चा करून योग्य ते धोरणात्मक निर्णय घेतल्या जातात. |
| आठ | आपला एक भाग म्हणुन किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणुन घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळुन बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण आणि त्यांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण. | महामंडळामध्ये संचालक मंडळ हे अग्रस्थानी असून सर्व धोरणात्मक निर्णय संचालक मंडळाव्दारे घेतल्या जातात. तसेच संचालक मंडळाव्दारे एक उपसमिती गठीत करण्यात आलेली आहे. संचालक मंडळ तसेच उपसमितीच्या बैठकीसाठी कार्यरत असलेल्या संचालकांना निमंत्रित करण्यात येते तर महामंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभे करिता सर्व भागधारकांना आमंत्रित करण्यात येते.<br><br>संचालक मंडळ तसेच उपसमितीचे कार्यवृत्ते/ इतिवृत्ते ही महामंडळाच्या संचालकांना पाहावयास उपलब्ध असतात तर वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त हे भागधारक शेतक—यांकरिता पाहण्यास उपलब्ध असतात. |

| कलम ४(१) | तरतूदी | माहितीचे विवरण |
|---|---|---|
| नऊ | अधिका—यांची आणि कर्मचा—यांची निर्देशिका | महामंडळामध्ये कार्यरत असलेल्या **अधिकारी तसेच कर्मचारी यांची निर्देशिका महामंडळाचे संकेत स्थळ www.mahabeej.com वर उपलब्ध आहे**. |
| दहा | प्रत्येक अधिका—याला व कर्मचा—याला मिळणारे मासिक वेतन, तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पध्दती. | महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय असलेल्या मासिक वेतनाच्या अनुषंगाने **पदनिहाय वेतनश्रेणीचा तपशील महामंडळाचे संकेत स्थळ www.mahabeej.com वर उपलब्ध आहे**.नुकसान भरपाई बाबत प्रचलीत कायदा तथा नियमानुसार नुकसान भरपाई अदा करण्यात येते. |
| अकरा | सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमुन दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रकमांचा तपशील | सर्व योजनांचा तपशील तसेच त्यावरील खर्च इत्यादि बाबतचा तपशील महामंडळाच्या वार्षिक अहवालामध्ये देण्यात येतो. वार्षिक अहवाल हा आमसभेमध्ये सर्व भागधारकांची त्यास स्विकृती मिळण्यासाठी ठेवण्यात येतो. |
| बारा | अर्थसंकल्प कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभधिका—यांचा तपशील | महामंडळाच्या अर्थसंकल्पामध्ये दरवर्षी योजनानिहाय खर्चाची तरतूद करण्यात येते व शासनाकडून संबंधीत योजने अंतर्गत निधी प्राप्त झाल्यानंतर तो संबंधीत शेतकरी लाभधारकांना अदा करण्यात येतो. या लाभधारकांचा तपशील हा महामंडळाच्या संबंधीत जिल्हा कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे. |
| तेरा | ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकररपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील | महामंडळाचा बियाण्याचा व्यवसाय हा सहकारी क्षेत्रातील तसेच खाजगी क्षेत्रातील अधिकृत विक्रेत्यांमार्फत करण्यात येतो. जिल्हानिहाय परवाना धारक विक्रेत्यांची माहिती संबंधीत जिल्हा कार्यालयात उपलब्ध आहे. |
| चौदा | इलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील. | इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आवश्यक ती माहिती महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. |
| पंधरा | माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणा—या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामाकाजाच्या वेळांचा तपशील | याबाबत महामंडळाने नागरिकांची सनद तयार केलेली असून त्यात सर्व सुवीधांचा तपशील देण्यात आलेला आहे. **नागरिकांची सनद महामंडळाचे संकेत स्थळ www.mahabeej.com वर उपलब्ध आहे**. |
| सोळा | जन माहिती अधिका—यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील. | जन माहिती अधिका—यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील **महामंडळाचे संकेत स्थळ www.mahabeej.com वर उपलब्ध आहे**. |
| सतरा | विहीत करण्यात येईल अशी माहिती | — |